# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०८/२०२६ (शनिवार)**

---

## पालकमंत्री मा.ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते संपन्न झाले पोलीस ठाणे मोहपा, नागपूर ग्रामीण चे अनावरन/उद्घाटन

**पोलीस ठाणे मोहपा :—** दि. ०८/०८/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस अंतर्गत शासनातर्फे मंजूरी मिळालेले नविन पोलीस ठाणे मोहपा तह. कळमेश्वर चे नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री तसेच महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते थाटात उद्घाटन व अनावरन संपन्न झाले. विशेष म्हणजे पोलीस ठाणे मोहपा चे कामकाज दि. १३/०६/२०२६ पासून जनतेच्या सेवेत कार्यान्वित करण्यात आले असून आज रोजी अधिकृतपणे उद्घाटन करण्यात आलेले आहे.

उद्घाटन प्रसंगी मा. पालक मंत्री तसेच महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचेसह मा. खासदार श्यामकुमार बर्वे , मा. आमदार डॉ. राजीव पोतदार, श्री.आशिषराव देशमुख, मा. श्री माधव चरजन, नगराध्यक्ष मोहपा असे सन्माननिय लोकप्रतिनीधी तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर श्री. संदीप पाटील, नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री. अनिल म्हस्के असे वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे तसेच कोणत्याही प्रकारच्या तक्रारी, माहिती अथवा मदतीसाठी मोहपा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन केले.

त्याचप्रमाणे नागपूर ग्रामीण पोलीसांच्या वतीने उपस्थित नागरिक, महिला, मुली तसेच बालकांना सायबर गुन्ह्यांच्या संबधाने माहिती देवून सायबर गुन्ह्यांचा बळी पडण्यापासून कशा प्रध्दतीने बचाव करता येईल यासंबधी मार्गदर्शन व उपाययोजनांची माहिती दिली. तसेच महिला व बालकांविरूध्द होणारे गुन्हे आणि त्यापासून बचाव, प्रतिबंध आणि गुन्हा

घडल्यास करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. तसेच मोहपा पोलीस स्टेशन ची हद्द व पोलीस स्टेशन अंतर्गत होणाऱ्या गावांचा समावेश याची माहिती देवून नागरिकांना कोणत्याही तक्रारी असल्यास विनाविलंब स्थानिक पोलीस स्टेशन ला तसेच अधिकृत हेल्पलाईन नंबर वर तक्रार दाखल करण्याबाबत अवाहन करण्यात आले. सदर प्रसंगी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील जवळपास ६०० पोलीस पाटिलांसह परिसरातील नागरिक व लोकप्रतिनीधींसह अ. २००० नागरिक उपस्थित होते. या प्रसंगाचे औचित्य साधुन नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे उपस्थित ६०० पोलीस पाटील यांची गोपाल सभागृह मोहपा येथे कार्यशाळा व संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.





# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ४ लाख १२७५ रूपयांचा मूद्देमाल जप्त भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०७/०८/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. मयंक माधव, सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनात भिवापूर पोलीसांनी सापळा रचत कारवाई केली असता आरोपी नामे कमालुददीन करीमउददीन सैयद, वय ४४ वर्ष रा. छोटा मस्जिद जवळ, गौतम नगर वार्ड, पवनी जि. भंडारा हा चारचाकी टाटा एस क्र. एम एच—३६/एफ—२२२० सह मिळुन आला. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्याचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण वजन ६०० ग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १२७५/— रूपये, चारचाकी टाटा एस क्र. एम एच—३६/एफ—२२२० किंमती ४,००,०००/—रूपये असा एकुण ४०१२७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. **आरोपी कमालुददीन करीमउददीन सैयद, वय ४४ वर्ष रा. छोटा मस्जिद जवळ, गौतम नगर वार्ड, पवनी जि. भंडारा** याचेविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २९ हजार ३३० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव** :– दिनांक ०७/०८/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मटकाझरी तलाव परिसरात एका घराचे बाजुला मोकळया जागेत काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पाचगाव पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अक्षय अरविंद भगत, वय ३० वर्षे, रा. मटकाझरी, तह. उमरेड, जि. नागपुर २) भुपेश प्रभाकर माणे, वय ४० वर्षे, रा. राधाकृष्ण नगर, नागपुर ३) मिलींद प्रभाकर राऊत, वय ४२ वर्षे, रा. शाहु नगर, हुडकेश्वर रोड, नागपुर ४) मनिष लहुभान गायकवाड, वय ४७ वर्षे, रा. शाम नगर, हुडकेश्वर रोड, नागपुर ५) राजेश देविदयाल शाहु, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. १६०, बिनाकी ले आऊट, वैशाली नगर, नागपुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम २९,३३०/–रूपये असा एकुण २९,३३०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०५ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन पाचगाव येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०८ गुन्हे नोंद

दिनांक ०७/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७९२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे सुनिल रमेश सेवतकर, वय ४० वर्ष, रा. गोडी दिग्रस याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे ताराचंद नत्थु पाटील, वय ५० वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) गजानन दौलत नागपुरे, वय ४६ वर्ष, रा. मकरधोकडा २) सचीन विठोबा नागपुरकर, वय ४० वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड ३) सावन सुरेश सिंदेकर, वय ४१ वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे १) राजु बाबाराव मन्ने, वय ३६ वर्षे, रा. बेला वार्ड क्र. ०३, ता. उमरेड, जि. नागपुर २) वसंता रघुनाथ कुबडे, वय ५२ वर्षे, रा. सालेभट्टी, ता. भिवापुर, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी येथे** आरोपी राहुल जयपाल भट, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ११०७० मिली देशी दारू, २००० मिली विदेशी दारू, २५ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ७९२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०४ गुन्हे नोंद. एकुण ३१,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०७/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन केळवद, सावनेर, बोरी, पाचगाव यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ३१,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे ३ आरोपी अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ९ आरोपी अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** येथे आरोपी नामे १) कैलास रामदास पुनवटकर, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, बेला, ता. उमरेड, जि. नागपूर २) अमर ज्ञानेश्वर मानकर, रा. बोरखेडी, ता. जि. नागपुर हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ५ आरोपी अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०८/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :–** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५९ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १७८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




पोलीस दुरक्षेत्र मोवाड
पोलीस स्टेशन नरखेड



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने